झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्थाचेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा१/मा.क्र२१५/नाना पेठ/३३२/२०२४
दिनांक : १४/०३/२०२४

# झोपडपट्टी निर्मुलन आदेश

(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ड अन्वये)

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख या पुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र.झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्व साधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्व साधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ३०/०६/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

२) ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगर पालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये भवानी पेठ सि.स.नं.११७८,११७९,११८०,११८१,११८२,११८४ चमडेगल्ली, नाना पेठ पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ७४८.४७ चौ.मी.क्षेत्रावर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. सोनाईदादा कंन्स्ट्रक्शन यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.०५/०५/२०१५ रोजी प्रस्ताव दाखल केलेला असून सदरच्या प्रस्तावास झो.पु.प्रा.विशेष नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार दि.०९/०६/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे; आणि

३) ज्याअर्थी, उक्त क्षेत्रातील झोपडपट्टी क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट - २) दि. ०३/०५/२०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून उक्त परिशिष्ट-२ नुसार सदर मिळकतीवर एकूण ४६ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र ३८, अपात्र ०५ आणि बिगरनिवासी पात्र ०१, बंद घरे ०२ या प्रमाणे एकुण पुनर्वसनास पात्र झोपडीधारक ३९ तर अपात्र ०७ ठरले आहेत; आणि

४) ज्याअर्थी, उक्त क्षेत्र दि.१९/०९/२०१९ रोजीच्या आदेशाद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार,२८/०२/२०१९ ते ०६/०३/२०१९, ऑक्टोंबर ३ - ९,२०१९ /अश्विन ११ - १७, शके १९४१ मधील पान क्र. ३१ व ३२ येथे प्रसिध्द करणेत आला आहे. तसेच सर्व साधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष योजना क्षेत्रात / झोपडपट्टीच्या जागेवर दि.१९/०९/२०१९ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आले आहे; आणि

५) ज्याअर्थी, कार्यालया चे जा.क्र. झोपुप्रा/ सप्रा-१/ मा.क्र.२१५/ शुद्धीपत्रक/ २४७/ २०२४, दि.०५/०३/२०२४ रोजीचे उक्त अधिनियमाच्या कलम ३ क बाबत शुद्धीपत्रक प्रसिद्ध केले असुन त्यानुसार, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून ७४८.४७ चौ. मी. इतके क्षेत्र घोषित करण्यात आले आहे; आणि

६) ज्याअर्थी, उक्त क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत शिखर तक्रार निवारण समिती अथवा प्राधिका-याचा कोणत्याही न्यायालयाचा योजना राबवणे संदर्भात स्थगिती आदेश नाही.सबब, झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती /झोपडया हटवून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

७) ज्याअर्थी, विकसक मे. सोनाईदादा कंन्स्ट्रक्शन यांचेमार्फत सदर योजनातंर्गत पात्र झोपडीधारकांना कायमस्वरूपी पुनर्वसन सदनिका देण्यात येईपर्यंतच्या संक्रमण कालवधीकरीता प्राधिकरणाचे नगररचनाकार, झोपुप्रा, पुणे यांचेकडून दि. १२/०३/२०२४ रोजी किमान मासिक रु.४९१६ /- इतके मासीक भाडे निर्धारित केले आहे. त्याअनुषंगाने, विकसक यांनी दि. ०७/०३/२०२४ रोजीच्या हमीपत्रान्वयेपात्र झोपडीधारकास प्रती झोपडी प्रती माह रक्कम रु. ५०००/-धनादेश देण्याचे मान्य बाब केली आहे; आणि

८) ज्याअर्थी, उक्त क्षेत्रातील उपरोक्त ३० दिवसांच्या कालावधीत रिकाम्या करण्यात न आलेल्या झोपड्यांचे / दुकानांचे सक्तीने निष्कासन करून ती जागा पुनर्वसन योजना राबविणेकामी मोकळी करणे आवश्यक आहे; आणि

त्याअर्थी, मी नीलेश गटणे,मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ ड आणि कलम १२ (३) व कलम ३१ या मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे 'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र' म्हणून घोषित करत आहे. सदरच्या क्षेत्रामधील उपरोक्त ३० दिवसांच्या कालावधीत रिकाम्या करण्यात न आलेल्या झोपड्यांचे / दुकानांचे सक्तीने निष्कासन करून या आदेशाची अंमलबजावणी करण्यास उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र ०१, झोपुप्रा पुणे यांना प्राधिकृत करीत आहे.

उक्त क्षेत्रातील सर्व झोपडीधारकांना प्रस्तुत आदेशाद्वारे कळविण्यात येतआहे की,

i) उक्त क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामयामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्या खालील जागा विकसकाच्या ताब्यात द्यावी.

ii) उपरोक्त ३० दिवसांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर या कार्यालयामार्फत उक्त क्षेत्रातील शिल्लक असलेल्या झोपडीधारकांचे कधीही सक्तीने निष्कासन करण्यात येईल.सक्तीने निष्कासित करण्यात आलेला कोणताही झोपडीधारक मग तो योजनेत पात्र असो वा अपात्र, त्याचा संक्रमण कालावधीतील सदनिकेचा / भाडेपोटीच्या रकमेचा अधिकार गमावेल.

iii) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

iv) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीतील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तसेच त्यानी प्राधिकृत केले आहे अशा उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र १, झोपुप्रा पुणे यांना राहतील.

v) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोष सिद्धी अंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंतअसू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या

शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये ३० दिवसांचे आत शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| पेठ / गाव / नगररचना योजना | स.नं. / सि.स.नं. / अंतिम भूखंड क्र. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) अंशत: / पूर्णत: | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| नाना पेठ, पुणे | ११७८, ११७९, ११८०, ११८१, ११८२, ११८४ | खाजगी + पुणे महानगरपालिका | ७४८.४७ चौ.मी. | **पुर्वेस** - सि.स.नं. ११५८ व ११५९ नाना पेठ<br>**पश्चिमेस** - सि.स.नं. ११८५ व ११९५<br>**दक्षिणेस** - सि.स.नं. ११६७<br>**उत्तरेस** - सि.स.नं. ११४ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.
स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :-१४/०३/२०२४

14.3.2024
नीलेश र. गटणे, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :-

१. सक्षम प्राधिकारी क्र १, झोपुप्रा पुणे यांना सूचित करण्यात येते की या आदेशाच्या प्रती योजनाक्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा
२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीसाठी सादर.
३. व्यवस्थापक, मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६ वरिल आदेश महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या २ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात .
४. विकसक मे. सोनाईदादा कन्स्ट्रक्शन, ३६,नाना पेठ, पुणे- ४११००२ यांना महितीस्तव.